वाचा:-१. ग्राम विकास विभागागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक
दिनांक २२/०२/२०१९

२. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.गावठाण/ड्रोन/SOP/प्र.क्र.१४२/२०२०
पुणे दिनांक २३/११/२०२०

३. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./गाजप्र/चौकशी/प्रसिद्धी/कावी.४२१/२०२२
पुणे दिनांक २७/०५/२०२२

४. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र/गावठाण/ड्रोनसर्व्हे/G.T/का.वि.६५१/२०२२
पुणे दिनांक ०५/०८/२०२२

५. नगर भूमापन नियम पुस्तिका प्रकरण ५.

---

**परिपत्रक**

क्र.गावठाण /स्वामित्व/Q.C./प्र.क्र. /२०२३
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचे कार्यालय
पुणे दिनांक :- ११ / १२/२०२३

**विषय:- जिल्हा स्तरावरुन गावठाण जमाबंदी प्रकल्प स्वामित्व योजने अंतर्गत अंतिम झालेल्या गांवाचे (Quality Checking) कामाची गुणवत्ता तपासणी व दुरूस्ती बाबत.**

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प स्वामित्व योजना प्रगतीपथावर आहे. सदर योजने अंतर्गत अंतिम नकाशा, चौकशी नोंदवही, सनद व अंतिम नगर भूमापन क्रमांकाच्या मिळकत पत्रिका इत्यादी अधिकार अभिलेख तयार होत आहेत. परंतु सदरच्या तयार झालेल्या अभिलेखांची नमुना दाखल या कार्यालयाकडून तपासणी केली असता त्यामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत. जनतेस तक्रारीस वाव मिळत असून त्यामुळे भूमि अभिलेख खात्याची प्रतिमा जनमानसात मलिन होत आहे. असे होवू नये म्हणून जिल्हा स्तरावरून स्वामित्व योजने अंतर्गत अंतिम झालेल्या गावाचे अभिलेखांचे कामाची गुणवत्ता (Quality Checking) तपासणी करणेबाबत सविस्तर मार्गदर्शन सुचना देणे विचाराधीन होते. प्राप्त तक्रारींच्या विश्लेषणाच्या अनुषंगाने भूमि अभिलेख विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गावठाण भूमापन प्रकल्प स्वामित्व योजने अंतर्गत जिल्हास्तरावरुन अंतिम झालेल्या गांवाचे (Quality Checking) कामाची गुणवत्ता तपासणी व दुरूस्ती करताना करावयाची कार्यवाही बाबत सविस्तर सूचना या परिपत्रकाव्दारे देण्यात येत आहेत.

**I. अभिलेखांची तपासणी करणेबाबत.-**

तपासणी कामी संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी या कार्यालयाकडून पुरविणेत आलेले डेटा ऑपरेटर/ डिझीटायझर यांचेकडून तपासणी करणे आवश्यक आहे.सदर प्राप्त तपासणी अहवालाची पुनश्च पडताळणी संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी करुन तदनंतर त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार दुरूस्तीबाबतचा प्रस्ताव संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना सादर करावा.

## १.नकाशा तपासणी

१.१ वाचा सदरील १ मधील शासन निर्णयातील मुद्दा क्र.२ प्रमाणे व वाचा सदरील २ मधील या कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक २३/११/२०२० मधील १.४.४ प्रमाणे गांवातील रस्ते, नाले, सार्वजनिक मिळकती व इतर मिळकती या डिजिटाईज्ड नकाशामध्ये बंदिस्त झालेल्या आहेत किंवा नाहीत याची तपासणी करणे. जेणेकरून, गांवठाणातील "सर्व जमीन/मिळकत/जागेचा नकाशा तयार होवून त्यांस नगर भूमापन क्रमांक दिला जाईल." (थोडक्यात गांवठाणाचे एकूण क्षेत्र अचूक निर्धारीत करता आले पाहिजे अशारीतीने)

१.२ गावठाण हद्द कायम भारतीय सर्व्हेक्षण विभाग (SoI) यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रारूप नकाशावर (Draft Map) योग्य पद्धतीने बसवलेली पाहिजे म्हणजेच गावठाणाच्या लगत असलेल्या गट नंबर/सर्व्हे नंबर यांच्या नकाशास किंवा क्षेत्रास बाधा उत्पन्न झालेली नसावी. याची जबाबदारी संबंधित तालुक्याच्या उप अधीक्षक भूमि अभिलेख या कार्यालयाची राहील.

१.३ स्वामित्व गावाच्या गावठाणातील सर्व मिळकतींना चालता नंबर व अनुषंगाने नगर भूमापन क्रमांक दिलेले असावेत.

१.४ स्वामित्व गावाच्या गावठाणातील सर्व मिळकतींना रस्ता सुविधा शक्यतो असावी.

१.५ स्वामित्व गावाच्या गावठाणातील मिळकतींचे नकाशे बंदिस्त करताना शक्यतो Zig-Zag ठेवलेले नसावे.

१.६ स्वामित्व गावाच्या गावठाणातील मिळकत व रस्ता यामध्ये निरूपयोगी निमुळती जागा सोडलेली नसावी. नगर भूमापन नियम पुस्तिकेमधील प्रकरण ५ मधील परिच्छेद क्र.९२ ते ९६ मधील नमूद तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

## २.चौकशी नोंदवही तपासणी

२.१ स्वामित्व गावाच्या गावठाणातील प्रत्येक मिळकतीला नकाशाप्रमाणे चालता नंबर दिलेला असावा.

२.२ स्वामित्व गावाच्या गावठाणातील सर्व धारकांची नांवे संपुर्णपणे नमूद केलेली असावी. चौकशी नोंदवहीच्या स्तंभ क्र.८क मध्ये इतर ११ किंवा इतर ५ वगैरे असे नमूद केलेले नसावे.

२.३ एकत्र कुटूंब मॅनेजर (ए.कु.मॅ.)या संज्ञेखाली धारकांची नांवे नोंदवयाची असल्यास सर्व सहधारकांची नांवे नमूद करून जरूर त्या नावासमोर ए.कु.मॅ. घोषित करावा.

२.४ स्वामित्व योजनेतील गावाच्या चौकशी नोंदवहीच्या स्तंभ क्र.८क मध्ये धारक सदरी स्वनिर्मित तसेच अप्रमाणित (nonstandard) शब्दांचा वापर केलेला नसावा. उदा.GP,OP, BLG,--, ८अ प्रमाणे व वगैरे.

२.५ स्वामित्व योजनेतील गावाच्या चौकशी नोंदवहीच्या स्तंभ क्र.९ अ मध्ये मिळकतीनुसार राज्यस्तरीय वैध सत्ता प्रकार योग्य रीतीने दिलेला असावा.

२.६ स्वामित्व योजनेतील गावाच्या महाराष्ट्र शासनाच्या मिळकतीस (सत्ता प्रकार-ग) व ग्रामपंचायत /जिल्हा परिषद/नगर परिषद/ महानगरपालिका इ. स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मिळकती (सत्ता प्रकार-फ) यामध्ये खाजगी व्यक्तींची नांवे दाखल केलेली नसावी.

२.७ स्वामित्व योजनेतील गावाच्या चौकशी नोंदवहीच्या स्तंभ क्र.११ मध्ये सर्व मिळकतींना अंतिम नकाशाप्रमाणे (Final Map) अंतिम नगर भूमापन क्रमांक दिलेला असावा.

### ३. मिळकत पत्रिका तपासणी

स्वामित्व योजने अंतर्गत तयार होणाऱ्या मिळकत पत्रिकेमधील गावाचे नांव, तालुक्याचे नांव, जिल्हयाचे नांव, नगर भूमापन क्रमांक, मिळकतीचे क्षेत्र (चौ.मी.), धारणाधिकार, धारकांची नांवे व इतर तपशिल संबंधित गावाच्या अंतिम नकाशा व चौकशी नोंदवहीप्रमाणे असावे.

वरील प्रमाणे सर्व बाबींची खात्री/पडताळणी करावी. वरील सुचनांव्यतिरिक्त इतर अन्य सर्व तपासणी प्रचलित कायदा, नियम, परिपत्रक व वेळोवेळी निर्गमित आदेशाप्रमाणे करणेत यावी.

### II. अभिलेखांची दुरूस्ती करणेबाबत.-

तपासणीमध्ये त्रुटी आढळल्यास खालील प्रमाणे दुरूस्ती कार्यवाही करावी.

1. DSC झालेला अंतिम नकाशा/चौकशी नोंदवही/मिळकत पत्रिका यामध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्तीचा प्रस्ताव हा संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी मंजूरीसाठी संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावा.
2. संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६चे कायदा कलम २०(२) व २५८ च्या तरतुदीनुसार प्रचलित नियम व कार्यपद्धतीनुसारच दुरूस्तीची विहीत कार्यवाही करावी.
3. संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी आवश्यकता वाटल्यास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६चे कायदा कलम २५७ मधील तरतुदीनुसार तपासणी करून व दुरूस्तीची विहीत ती कार्यप्रणाली अवलंबून कार्यवाही करावी.

### १. .नकाशा दुरूस्ती

१.१ संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या उक्त नमूद तरतुदीनुसार पुर्व परवानगी आदेशानेच संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी अंतिम नकाशामध्ये त्रुटी दुरूस्तीची कार्यवाही विहीत प्रणाली अवलंबून करावी .

१.२ सर्व अंतिम नकाशांचे Geo Data Base File (.gdb) हे Mahasvamitva Information System (MSIS) आज्ञावलीमध्ये उपलब्ध आहेत. त्यामुळे योग्य त्या Software च्या सहाय्याने सदर Geo Data Base File (.gdb) मध्ये Digitizer / खाजगी संस्था यांच्या सहाय्याने आवश्यक ती दुरूस्ती करावी.

१.३ तयार झालेला सदरचा दुरूस्ती नकाशा पुन्हा अंतिम करण्यासाठी भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्याकडे पाठवावा.[**त्यापूर्वी MSIS मध्ये जुना असलेला अंतिम नकाशा योग्य त्या शेऱ्यासह (Final Map Rejection Remark) नाकारावा. तसेच शेऱ्यामध्ये नवीन दुरूस्ती नकाशा (Corrected Map) अपलोड केल्याबद्दल व त्यानुसार अंतिम नकाशा व Area Statement तयार करण्याची विनंती भारतीय सर्वेक्षण विभाग (SoI) यांना करावी.**]

I/202798/2023 १.४ भारतीय सर्वेक्षण विभाग (SoI) यांचेकडून नव्याने अंतिम नकाशा व Area Statement प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार चौकशी नोंदवहीमध्ये आवश्यक ती दुरूस्ती करावी.

१.५ वरील अंतिम नकाशामध्ये झालेली दुरूस्तीनुसार चौकशी नोंदवही व मिळकत पत्रिका यामध्ये अनुषंगिक विहीत प्रणाली अवलंबून दुरूस्तीची कार्यवाही करावी.

## २. चौकशी नोंदवही दुरूस्ती

२.१ संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या उक्त नमूद तरतुदीनुसार पुर्व परवानगी आदेशानेच संबंधित तालुक्याचे उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी विहीत कार्यप्रणालीचा अवलंब करून चौकशी नोंदवहीमध्ये योग्य त्या दुरूस्तीची कार्यवाही करावी.

२.२ स्वामित्व गावाच्या गावठाणातील ज्या गावांचे मिळकत पत्रिका ePCIS मध्ये DSC झालेले नाहीत त्या गावाचा चौकशी नोंदवहीचा DATA हा उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी ePCIS मधून पुन्हा MSIS कडे वर्ग करावा.

२.३ संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी दुरूस्ती करावयाच्या चौकशी नोंदवही मध्ये MSIS मधील चौकशी अधिकारी यांच्या Login मधून Enquiry Window मध्ये प्रवेश करावा.

२.४ तदनंतर विहीत कार्यपद्धती अवलंबून चौकशी नोंदवहीमध्ये आवश्यक ती दुरूस्ती करावी.

२.५ चौकशी नोंदवहीमध्ये दुरूस्ती करून शेरा रकान्याध्ये संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या परवानगी आदेशाची आणि संबधित दुरूस्ती करणारा प्राधिकारी यांच्या आदेशाचा क्रमांक व दिनांक याचा तपशिल नमूद करावा.

२.६ सदरची दुरूस्ती चौकशी नोंदवही MSIS मधून Download करून त्यावर संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/ विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी DSC करून सदर चौकशी नोंदवही चौकशी अधिकारी यांचे Login मधून पुन्हा MSIS मध्ये Upload करावी.

२.७ पुर्वीच्या मूळ चौकशी अधिकारी यांच्या कडून DSC झालेली मुळ चौकशी नोंदवही MSIS मध्ये मूळ अवस्थेत संधारण करावी.

२.८ वरील प्रमाणे चौकशी नोंदवहीमध्ये आवश्यक ती दुरूस्ती करून MSIS मधून चौकशी नोंदवहीचा Data Push to e-PCIS करावा व पुढील मिळकत पत्रिका DSC ची अनुषंगिक कार्यवाही e-PCIS मध्ये करावी.

## ३. DSC झालेल्या मिळकत पत्रिका दुरूस्ती.

३.१ संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या उक्त नमूद तरतुदीनुसार पुर्व परवानगी आदेशानेच संबंधित तालुक्याचे उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी विहीत कार्यप्रणालीचा अवलंब करून मिळकत पत्रिकेमध्ये योग्य त्या दुरूस्तीची कार्यवाही करावी.

I/202798/2023 ३.२ ज्या गावांचे मिळकत पत्रिका ePCIS मध्ये DSC झालेले आहेत अश्या गावाच्या मिळकत पत्रिकेमध्ये आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या परवानगी आदेशाची नोंद करूनच फेरफाराने आवश्यक ती दुरूस्ती करावी.

**वाचा सदरील क्र.४ नुसार उपसंचालक भूमि अभिलेख व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी वरील सर्व तपासणी व दुरूस्ती कार्यवाहीवर नियंत्रण ठेवावे.**

**सदरचे परिपत्रक दिनांक २२/०२/२०१९ पासून गावठाण जमाबंदी प्रकल्प-स्वामित्व योजने अंतर्गत कार्यवाही पुर्ण झालेल्या किंवा होणाऱ्या गांवासाठी पुर्वलक्षी प्रभावाने लागू होईल.**

Signed by
Niranjan Kumar Sudhansu
Date: 14-12-2023 15:20:18

**( एन.के.सुधांशु )**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे**

प्रत:-

१. अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख ,पुणे यांना माहितीस्तव.
२. उप संचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन,एकत्रीकरण)पुणे यांना माहितीस्तव.
३. उप संचालक भूमि अभिलेख पुणे/मुंबई/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती आवश्यक कार्यवाहीसाठी.
४. सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
६. सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.